२ पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, २९ फेब्रुवारी २०२४

# नेहा भस्मे हिचे रविवारी 'आरंगेत्रम'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रकाश नृत्यकला मंदिरच्या गुरू मोहिनी दिवाण यांची शिष्या नेहा संजय भस्मे ही आरंगेत्रम कलाविष्कारातून रंगमचावर पहिले पदार्पण करणार आहे. रविवारी (दि. ३) सायंकाळी साडेपाच वाजता, संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात हा कार्यक्रम होईल. कार्यक्रमाला अभिनेत्री मधुरा वेलणकर-साटम उपस्थित राहणार असून आरंगेत्रमला उपस्थित राहण्याचे आवाहन सुप्रिया भस्मे यांनी केले आहे. नेहाने श्रीमंत माईसाहेब बावडेकर विद्यालयातून शालेय शिक्षण, तर विवेकानंद महाविद्यालयातून बी. कॉम.चे पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून देवयानी धर्माधिकारी यांच्याकडे भरतनाट्यमचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. २०१२ पासून गुरू मोहिनी दिवाण यांच्याकडे नृत्य शिकण्यास सुरूवात केली. २०१८ मध्ये तिने भरतनाट्यम विशारद शिक्षण पूर्ण केले.

